# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

## सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या

## माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी

## शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५

## आदिवासी विकास विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ७

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: टी-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण**<br>**रूपये:- २,४२,०५,०३,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१) | ६३७ | १० | भंडारा जिल्हयात लाखनी व लाखांदूर तालुक्यातील आदिवासी मुला/मुलींचे शासकीय वसतीगृह नसणे, त्यामुळे शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यींचे शैक्षणिक नुकसान होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२) | ४०९ | १० | आदिवासी विभागामार्फत चालवण्यात येणाऱ्या ५५२ शासकीय आश्रमशाळांमध्ये १८७३९२ हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असणे ,सदरील विद्यार्थ्यांना आहारात दररोज २५० मिली दुध देण्याचे शासनाचे धोरण असणे ,सन २०२३-२४ मध्ये आदिवासी विकास आयुक्तालयामार्फत दुधाच्या ५.७१ कोटी टेट्रा पॅकसाठी निविदा प्रक्रिया राबवली गेलेली असणे ,सदर निविदा प्रक्रियेमधून शासनाने पराग मिल्क फुड्स आणि वारणा सहकारी दुध संघ नामक दोन संस्थाना २९.२० रु प्रति टेट्रा पॅक दराने म्हणजेच १४६ रु प्रति लिटर दराने दुध पुरवठा करण्याचे कंत्राट दिले असणे ,एकीकडे राज्यात शेतकऱ्यांना दुधासाठी ३० रु पेक्षा कमी दर मिळत असताना सदरील दोन संस्थांकडून शासन मात्र १४६ रु दराने दुध खरेदी करत असणे, शासनाच्या धोरनानुसार विद्यार्थ्यांना दररोज २५० मिली दुध पुरवठा करण्याचे धोरण असताना सदरील संस्था मात्र केवळ २०० मिली प्रतिदिन प्रती विद्यार्थी असा दुध पुरवठा करत असणे , सदरील निविदा प्रक्रियेत शासनाने जवळपास ८५ कोटी हून जास्त रक्कम अतिरिक्त दिली असल्याचे तसेच ठराविक निविदाकार सदरील निविदेसाठी पात्र होणेसाठी अटीशर्थी बदलल्या असल्याचे देखील उघडकीस आलेले असणे, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**रूपये:- ६,००,००,०००/-**<br>**श्री. अनंत (बाळा) नर** |
| (३) | १६७ | १०० | जोगेश्वरी पूर्व विधानसभा कार्यक्षेत्रातील आरे मध्ये २७ आदिवासी पाडे असून हे आदिवासी पाडे, वीज, पाणी, व मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असणे, या भागात शासनाचे कोणतेही रुग्णालय नसल्याने बऱ्याचदा सर्पदंश, अपघात अशा घटना झाल्यास उपचार तात्काळ न मिळाल्यामुळे मृत्यूला सामोरे जावे लागणे, सध्या असलेले वैद्यकिय रुग्णालयात अपुऱ्या सुविधा असणे, तसेच सदरहू भाग हा वन विभागात मोडत असल्याने बिगर आदिवासी बांधवांना घर दुरुस्तीची परवानगी मिळत नसणे, या आदिवासी पाडयांमध्ये हॉस्पिटल नाही, अंतर्गत रस्त्याची दैनावस्था, वाहतुक कोंडी आदि समस्यामुळे हे पाडे विकासापासून वंचित राहिलेले असणे, आदिवासी पाडयांच्या विकासाबाबत अनेक वेळा या सभागृहात चर्चा होऊनही शासन गंभीर नसणे, देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्ष झाली. पण आजही आदिवासी पाडे मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, आदिवासींचे जीवनमान उंचविण्याकरिता आदिवासी पाडयांचा विकासाकडे लक्ष देण्याची आवश्यकता याकरिता भरीव निधी तरतूदीची गरज असण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण**<br>**रूपये:- ७७,११,०८,०८,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (४) | ६४६ | १० | राज्यातील १०६ अनुदानित आश्रमशाळांतील पटसंख्येचे कारण समोर करुन पहिली ते चौथीपर्यंतची मान्यता रद्द करुन मा.आदिवासी विकास मंत्री यांच्या संकल्पनेतून "संवाद चिमुकल्यांशी" अभियान राबविण्याबाबत शासन विचाराधीन असल्याचे दिनांक ७ फेब्रुवारी, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, त्यामुळे प्राथमिक वर्ग बंद केल्यास शाळेत काही प्रमाणात येणाऱ्या विद्यार्थ्यांचे व कार्यरत असलेल्या शिक्षकांचे व कर्मचाऱ्यांचे भविष्य धोक्यात आले असून आदिवासी आश्रमशाळा चालविणाऱ्या संस्थाचालक, शिक्षक व कर्मचाऱ्यांकडून विरोध होत आहे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (५) | ४५२ | १० | पेठ रोड, नाशिक येथे आदिवासी मुलींचे वसतीगृह असून सदरच्या वसतीगृहाची ५०० मुलींची क्षमता असणे, वसतीगृहाची इमारत जीर्ण झाली असणे, इमारतीला तडे गेले असणे, पाण्याचे पाईप तुटले असणे, पाणी गळती होत असणे, त्याठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असणे, डासांचा प्रादुर्भाव वाढला असणे, पंखे तुटले असणे, पिण्याच्या पाण्याच्या फिल्टरची व्यवस्था नसणे, गरम पाण्याची व्यवस्था नसणे, संरक्षक भिंत नसणे, त्यामुळे वसतीगृहातील मुलींची गैरसोय होत असणे, संरक्षक भिंती अभावी मुलींच्या सुरक्षितता धोक्यात आली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी पालकांमध्ये व विदयार्थ्यींमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०६, वनीकरण व वन्यजीवन**<br>**रूपये:- १५,९६,४२,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (६) | ४५३ | १० | राज्यातील आदिवासी व वन निवासी यांच्या जंगलावरील हक्कांची कायदेशीर नोंद करून हक्क प्रदान करण्यासाठी संसदेने पारित केलेल्या वन हक्क कायदा २००६ च्या अपुऱ्या व अयोग्य अंमलबजावणी संदर्भात राज्यभर आदिवासी संघटनांची झालेली वेळोवेळी आंदोलने, आश्वासन मिळूनही त्याची पूर्तता न होणे, कायदा होऊन १९ वर्षांनंतरही हजारो आदिवासी ना वैयक्तिक व सामूहिक हक्क अभिलेख न मिळणे, पात्र दावे मोठ्या प्रमाणात फेटाळले जाणे, याबाबत झालेली अक्षम्य दिरंगाई, आदिवासी व वन निवासींवरील ऐतिहासिक अन्याय अद्याप न संपणे, यासंदर्भात सदर आदिवासी संघटनांनी दिनांक. १७/३/२०२५ रोजी कोकण आयुक्तांच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, यामुळे राज्यभर आदिवासी व अन्य वन निवासी जनतेच्या मनात निर्माण झालेली अस्वस्थता व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४२५, सहकार**<br>**रूपये:- ६०,२१,०३,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (७) | ४१३ | १० | गडचिरोली जिल्हयातील एटापल्ली तालुक्यातील हेडरी येथील आदिवासी कार्यकारी सहकारी संस्थेत सन २०२२-२३ मध्ये मोठया प्रमाणात धान खरेदी करण्यात येणे, या धान खरेदीत पुरवठा अधिकारी, आदिवासी विकास महामंडळाच्या तत्कालीन व्यवस्थापकाच्या संगनमताने मोठया गैरप्रकार करण्यात येणे, आदिवासी कार्यकारी सहकारी संस्थेच्या केंद्रात सन २०२२-२३ या हंगामात खरेदी केलेल्या १ कोटी ३७ लाख रूपये किमंतीची १३ हजार धानाने भरलेली |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पोती कमी आढळून येणे, या गंभीर प्रकरणाची तक्रार करण्यात आली असता आदिवासी विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी चौकशी करून आलदांडी येथील पोलीस ठाण्यात दिनांक २५ जानेवारी, २०२४ रोजी उपप्रादेशिक अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल करणे, तब्बल एक वर्ष होऊन सुध्दा पोलीसांची कारवाई संथ गतीने सुरू असणे, यात सामील असलेले वरिष्ठ अधिकारी, मोठे व्यापारी व दलाल यांच्यावर अद्यापही कोणतीही कारवाई होत नसल्यामुळे नागरिकांत पसरत असलेले तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २० मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) आदिवासी विकास विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई